INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 9 | OCTOBER - 2022

# स्वयं अर्थसहाय्यित शाळा व शासनाचे धोरण

सर्फराज खतीब

## प्रस्तावना :



शिक्षकाविषयी असे म्हटले जाते की, “शिक्षक म्हणजे ज्ञानाचा उगम आणि अखंड वाहणारा झरा. शिक्षक म्हणजे निष्ठा आणि कर्तव्य, शिक्षक म्हणजे निस्सीम श्रध्दा आणि भक्ती.शिक्षक म्हणजे विश्वास आणि वात्सल्य, शिक्षक म्हणजे आदर्श आणि प्रमाणतेचे मूर्तीमंत प्रतिक" परंतु दुर्दैवाने आज सोलापूर जिल्हयातील व महाराष्ट्रातील हजारो स्वयं अर्थसहाय्यित शाळांतील शिक्षकांना शासन आणि संस्थापकांकडून अत्यंत साधारण व दुय्यम वागणूक मिळत आहे.

"ज्या शाळांना कोणत्याही प्रकारचे अनुदान मिळणार नाही, या अटीवर मान्यता मिळालेली असते अशा शाळा म्हणजे स्वयं अर्थसहाय्यित शाळा होय." अशा शाळांमध्ये काम करणा-या शिक्षकांना ‘ स्वयं अर्थसहाय्यित शिक्षक’ म्हणून ओळखले जाते. स्वयं अर्थसहाय्यित शाळांतील शिक्षकांना कौटुंबिक गरजा भागविण्यापुरतेही मानधन मिळत नसल्याने त्यांना आर्थिक, मानसिक, कौटुंबिक, सामाजिक समस्यांना तोंड द्यावे लागते, या गोष्टींचा परिणाम काही अंशी शाळांच्या गुणवत्तेवर होताना आढळतो. परंतु अशा शाळांतील शिक्षक आपली कर्तव्ये पूर्ण झाल्यानंतर आपल्या कुटुंबाच्या पालन पोषणासाठी दुय्यम दर्जाची कामे करतात, हे वास्तव आहे.

२१व्या शतकातील ज्वलंत व संवेदनशील समस्या म्हणून स्वयं अर्थसहाय्यित शाळांतील शिक्षकांकडे पाहता येईल. स्वयं अर्थसहाय्यित शाळांना पुरविल्या जाणाऱ्या आर्थिक सहाय्याचा त्या स्वयं अर्थसहाय्यित शाळांवर सकारात्मक परिणाम होतो. शासनाकडून भरीव आर्थिक मदत नसताना स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर चालविल्या जाणाऱ्या या शाळा किती प्रमाणात उत्तम दर्जाचे शिक्षण देऊ शकतात. हा प्रश्न समाजासमोर उभा आहे. शासनाकडून सन 2000 पूर्वी माध्यमिक शाळांना विनाअनुदानित शाळा अशी मान्यता प्राप्त होत होती, नंतर त्या स्वयं अर्थसहाय्यित शाळांना टप्प्याटप्याने अनुदान प्राप्त होत होते. एकंदरीत शाळा अनुदानित झाली की, त्यामधील शिक्षकांनाही शासनाकडून चांगला पगार प्राप्त होत होता. परंतु शासनाचे शिक्षणाबाबतचे बदलते धोरण, राजकारण्यांचा शिक्षण क्षेत्रातील प्रवेश, पैसा मिळविण्याचे साधन या सर्व दृष्टीकोनातून कायम स्वयं अर्थसहाय्यित शाळा स्थापन करणा-यांची संख्या वाढली. त्याअनुषंगाने शासनाने सन 2012 नुसार शासन निर्णयान्वये आर्थिक भार कमी करण्याच्या दृष्टीने स्वयं अर्थसहाय्यित परंतु टप्प्याटप्प्याने प्राप्त होणारे अनुदान कायमस्वरूपी बंद करुन कायम स्वयं अर्थसहाय्यित शाळांना मान्यता देण्याचे धोरण अवलंबले. त्यामुळेच कायम स्वयं अर्थसहाय्यित शाळांची संख्या वाढली. या शाळांतील शिक्षकांनाही विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. त्यातील प्रमुख समस्या ही आर्थिक आहे. त्याचा नकळत परिणाम गुणवत्तेवर होतो.

स्वयं अर्थसहाय्यित शाळा या शिक्षण व्यवस्थेचा महत्वाचा भाग आहेत. सोलापूर जिल्हयाचा विचार करता जवळपास 282 शाळा या स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर कार्यरत आहेत. स्वयं अर्थसहाय्यित शाळा उत्कृष्ठ गुणवत्ता व दर्जा राखून चालावयाच्या असतील तर संबंधित संस्था किंवा शाळांची आर्थिक स्थिती चांगली असणे आवश्यक ठरते. त्यासाठी स्वयं अर्थसहाय्यित शाळांना शिक्षकांचे पगार, विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या भौतिक सोयी, इमारत, ग्रंथालय, इत्यादी कामांसाठी शासनाकडून भरीव अनुदान मिळणे अगत्याचे ठरते, यासाठी शासनाने कठोर आणि तातडीने पाऊल उचलणे गरजेचे आहे.

## स्वयं अर्थसहाय्यित शाळा :

स्वयं अर्थसहाय्यित शाळा योजना म्हणजे स्वतःच कमवा आणि खर्च करा, सरकारकडे मदत मागू नका असाच हेतू असल्याचा आरोप या क्षेत्रात कार्यरत सामाजिक संघटनांनी केला आहे. स्वयं अर्थसहाय्यित शाळांना मंजूर करताना सरकारने काही निकष लागू झाले आहेत.

सरकारवर आर्थिक बोजा न पडता शिक्षणसंस्था उभ्या रहाव्या आणि त्यातून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे म्हणून २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात कोल्हापूर जिल्ह्यात ७६ तर विभागात २१४ स्वयं अर्थसहाय्यित शाळांना मंजूरी देण्यात आली आहे. दर्जेदार शिक्षण देण्यासह शिक्षणाचे सार्वत्रिकरण व्हावे यासाठी सरकारने कायम विनाअनुदानित तत्त्वावर मंजूर झालेल्या शाळांपैकी कोल्हापुरात ४८ तर विभागात १४५ प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा नव्याने सुरू झाल्या आहेत. त्यामुळे नव्या शैक्षणिक वर्षात अशा १४५ स्वयं अर्थसहाय्यित शाळा विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी सज्ज झाल्या आहेत.

राज्य सरकारने शाळांना अनुदान देणे थांबविण्याचे धोरण अवलंबवला आहे. त्यामुळे अनेक शाळांतील कर्मचाऱ्यांची आर्थिक स्थिती बिकट झाली आहे. शाळेला अत्यावश्यक असलेल्या सोयी-सुविधांचा अनेक शाळांमध्ये अभावही असतो. त्यातून अनेक शाळांचा शैक्षणिक दर्जा खालावल्याचे दिसून येते. या समस्या सोडविण्याऐवजी त्या अधिक वाढविण्याचे काम सरकारकडून होत असल्याचा आरोप संस्थाचालकांचा आहे. स्वयं अर्थसहाय्यित शाळा योजना म्हणजे स्वतःच कमवा आणि खर्च करा, सरकारकडे मदत मागू नका असाच हेतू असल्याचा आरोप या क्षेत्रात कार्यरत सामाजिक संघटनांनी केला आहे. स्वयं अर्थसहाय्यित शाळांना मंजूर करताना सरकारने काही निकष लागू झाले आहेत. ग्रामीण भागासाठी दोन लाख तर शहरी भागात शाळा सुरू करण्यासाठी ५ लाख रुपयांची मुदतठेव ठेवावी लागते. महापालिका आणि जिल्हा परिषदेच्या शाळांप्रमाणेही या खासगी शाळांनाही शिक्षण हक्क कायद्यानुसार (आरटीई) निषकानुसार शाळेसाठी स्वतंत्र इमारत, प्रत्येक शिक्षकामागे एक वर्गखोली, मुले आणि मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय, स्वयंपाकगृह, शाळेभोवती कंपाउंड, खेळाचे मैदान, अडथळाविरहित प्रवेशमार्ग (रॅम्प), मुख्याध्यापकांसाठी स्वतंत्र कार्यालय आणि ग्रंथालय असे दहा निकष पूर्ण असतील तरच शाळांना मंजूरी देण्यात येते. २०१४-१५ मध्ये नवीन शाळांना मान्यता, कार्यरत असलेल्या शाळांच्या दर्जामध्ये वाढ करण्यात आली आहे. यात कोल्हापुरातील २५ स्वयंअर्थसहाय्यित शाळांना दर्जावाढ देण्यात आली आहे. मंजूर झालेल्या शाळांपैकी ७ शाळा सुरू झाल्या आहेत. कोल्हापूर, सांगली, सातारा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या कोल्हापूर विभागात ५९ शाळांना मंजूरी देण्यात आली असून त्यापैकी ३० शाळा सुरू झाल्या आहेत.

नव्याने स्थापन होणाऱ्या खासगी शाळांना (स्वयं-अर्थसहाय्यित) मोफत आणि सक्तीच्या शिक्षण हक्क कायद्याच्या सर्व तरतुदी लागू करण्याची महत्त्वपूर्ण शिफारस विधिमंडळाच्या संयुक्त समितीने केली आहे. राज्य सरकारने प्रस्तावित केलेल्या या नव्या कायद्याला विधिमंडळाच्या चालू अधिवेशनात मंजुरी मिळाल्यास पुढील शैक्षणिक वर्षांपासून खासगी संस्थाना नवीन शाळा उघडण्यास परवानगी मिळणार आहे.

महाराष्ट्र स्वयं-अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) विधेयक एप्रिल महिन्यात मांडण्यात आले होते. मात्र, या विधेयकातील अनेक तरतुदींबद्दल आक्षेप घेण्यात आल्यानंतर हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यात आले होते. शालेय शिक्षणमंत्री राजेंद्र दर्डा यांच्या अध्यक्षतेखाली समितीने आज आपला अहवाल विधान परिषदेत सादर केला. त्यात खासगी शाळांबाबत अनेक महत्वपूर्ण शिफारशी करण्यात आले आहेत.

या विधेयकाच्या नव्या मसुद्यानुसार ज्या संस्थांना सरकारच्या मदतीविना शाळा सुरू करायची आहे त्यांना शाळा उघडता येईल. त्यासाठी संबंधित संस्थेला राज्य सरकारकडून परवानगी घ्यावी लागेल. मात्र, या संस्थेला कोणतेही अनुदान मिळणार नाही. या शाळांमधील शिक्षण शुल्क हे व्यवहार्य आणि वाजवी असेल. कोणत्याही संस्थेला धंदा म्हणून शाळा चालविता येणार नाही. शुल्क नियमन कायद्यानुसार खासगी शाळांना शुल्क आकारता येईल. तसेच संस्थेला शिक्षण हक्क कायद्यानुसार सुविधा द्याव्या लागतील, असे अहवालात नमूद करण्यात आले आहे. विधेयकात 'विद्यमान शाळा' या उल्लेखाऐवजी 'मान्यताप्राप्त शाळा' असा उल्लेख करण्यात आला आहे. विधेयकात संस्थेचा 'नोंदणीकृत कंपनी' असा उल्लेख होता. हा शब्द वापरल्याने अनेक खासगी कंपन्या शाळा सुरू करतील आणि स्वत:चे निर्णय स्वत: घेऊन मनमानी करतील. परिणामी शिक्षणाचे औद्योगिकीकरण होईल, अशी भीती व्यक्त करण्यात आली होती. त्यामुळे 'कंपनी' शब्द वगळून 'स्थानिक प्राधिकरण' हा शब्द वापरण्यात आला आहे. ज्या संस्थेला शाळा सुरू करायची आहे अशा संस्थेच्या अर्जाच्या स्वीकृतीबाबत सरकारचा निर्णय दरवर्षी ३० एप्रिलपूर्वी कळविण्याची तरतूद करण्यात आली आहे. याशिवाय अर्जदाराचा अर्ज का नाकारण्यात आला याची माहिती १ मे पूर्वी देण्यात यावी, अशीही सुधारणा विधेयकात करण्यात आली आहे.

या नियमानुसार सुरू झालेली कोणतेही शाळा दीड वर्ष अगोदर सरकारला पूर्वसूचना दिल्याशिवाय बंद करता येणार नाही. तसेच शाळेसाठी दाखल झालेल्या प्रस्तावांना परवानगी देताना जाणूनबुजून दुर्लक्ष केल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची तरतूदही करण्यात आली आहे. हे विधेयक हिवाळी अधिवेशनात मंजूर झाले तर राज्यात पुढील वर्षापासून खासगी विद्यापीठाप्रमाणे कायम विनाअनुदानित खासगी शाळा सुरू होऊ शकतील.